नांदेड वार्ता दि. 19/09/2022

# काळ्या बाजारात तांदूळ घेवून जाणारा ट्रक पोलीसांनी पकडला

नांदेड/प्रतिनिधी-गुजरात राज्यातील स्वस्त धान्य दुकानामधील तांदुळ जमा करुन घेवून जाणारा ट्रक शनिवारी मध्यरात्री हदगाव पोलीसांनी पकडला आहे.

गुजरात येथील स्वस्त धान्य दुकानातील तांदुळ मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी हैद्राबादला नेला जातो. शनिवारी रात्री एक ट्रक तांदुळ घेवून जात असल्याची माहिती हदगाव पोलीसांना मिळाली. उमरखेड टी-पॉईंट येथे पोलीसांनी सापळा रचून ट्रक क्रमांक जी. जे.-२५-यु-७८५८ अडविला. पोलीसांनी ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ३० टन तांदुळ आढळून आला. पोलीसांनी ५ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा ३० टन तांदुळ व ट्रक जप्त केला आहे. फौजदार संजय गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हदगाव पोलीस ठाण्यात कारभाई अमराभाई सिंदल (वय ३८), रा.राणावाव जि.पोरबंदर याच्या विरुध्द कलम ३,७ अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुजराती ट्रस्टच्या

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड गुजराती नवरात्र महोत्सव समिती ट्रस्ट च्या अध्यक्ष पदी समाज सेवक हरेश ठक्कर यांची तर सचिव पदी जितेंद्र चौहाण याची बिन विरोध निवड करण्यात आली.

सदरिल निवड ही पाच वर्षासाठी असून इतर पदाधिकारी व सदस्य खालील प्रमाणे आहेत.

दै. लोकमत दि. 20/09/2022

रापपता आहे.

दै. लोकमत दि. 20/09/2022

# टोळीची अफवा पसरविली तर खबरदार

## डायल ११२ वर तातडीने संपर्क साधा

जिल्ह्यात मुले पळविणारी टोळी आली आहे, अशा आशयाचे संदेश आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल करण्यात येत आहेत. संशयास्पद व्यक्ती आढळून आल्यास लगेच पोलिसांशी संपर्क साधा; परंतु अफवा पसरविणे आणि मारहाण केल्यास संबंधितांवर गुन्हा नोंदविण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी दिला आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जिल्ह्यात सध्या लहान मुले पळविणारी टोळी सक्रिय झाल्याची अफवा पसरविण्यात येत होती. तसेच अन्य राज्यांतील मारहाणीचे व्हिडीओही व्हायरल झाले होते. त्याच दरम्यान इतवारा भागातील एका कंत्राटदाराचा १६ वर्षीय मुलगा बेपत्ता झाला होता. हा मुलगा घरातून बाहेर पडल्यानंतर थेट राजस्थानातील आपल्या आत्याकडे गेला होता.

राज्यात अनेक ठिकाणी मुले पळविणारी टोळी असल्याच्या [illegible] फेरीवाले, साधू यांना बेदम मारहाण करण्यात येत आहे. सांगली जिल्ह्यातही संतांची गाडी अडवून त्यांना मारहाण केली होती. तसेच या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातही मुले पळविणारी टोळी असल्याच्या अफवांचा बाजार उठला होता. त्यामुळे पालक वर्गामध्ये भीतीचे वातावरण होते. त्यातच मारवाड गल्ली भागातील परमानंद ताराचंद सोनी यांचा १६ वर्षीय मुलगा नमन हा घरातून बेपत्ता झाला होता. तो मुलगा आत्याकडे गेल्याचे स्पष्ट झाले.